ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक २५ • शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# माहूर घाटात शंभर फूट दरीत टेम्पो कोसळला;तिघांचा मृत्यू

## रेणुका मातेचे दर्शन घेऊन परतताना भाविकांवर काळाचा घाला



माहूर/प्रतिनिधी-श्रीक्षेत्र माहूर गडावर सुरू असलेल्या शारदीय नवरात्रोत्सवात रेणुका मातेचे दर्शन घेऊन यवतमाळकडे परतणाऱ्या भाविकांच्या टेम्पोला माहूर घाटात भीषण अपघात झाला. समोरून येणाऱ्या वाहनाचा प्रखर प्रकाश डोळ्यांवर पडल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि टेम्पो सुमारे शंभर फूट खोल दरीत कोसळला. या अपघातात तीन जण ठार तर दोन जण जखमी झाले. सदरील अपघात आज पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास घडला आहे.

यवतमाळ येथील फर्निचरच्या दुकानात काम करणारे सहा कामगार एम.एच. २९ बी.ई. ६८५९ क्रमांकाच्या मॅक्सिमो जितो टेम्पोने गुरुवार (दि.१५) रात्री साडेदहा ते अकराच्या सुमारास माहूरकडे दर्शनासाठी निघाले होते. रात्री बाराच्या सुमारास माहूर येथे पोहोचल्यानंतर त्यांनी श्री रेणुका मातेचे दर्शन घेतले. धार्मिक कार्यक्रम आटोपून गुरुवारी पहाटे पाचच्या सुमारास त्यांनी यवतमाळकडे परतीचा प्रवास सुरू केला. घाटातील पहिल्या धोकादायक वळणावर समोरून येणाऱ्या वाहनाचा प्रखर प्रकाश चालकाच्या डोळ्यांवर पडला. त्यातच समोरील वाहन विरुद्ध दिशेने आल्याने चालकाने टेम्पो बाजूला घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, वाहनावरील नियंत्रण सुटल्याने टेम्पो थेट खोल दरीत कोसळला. या वळणावर संरक्षक कठडा किंवा मजबूत संरक्षक भिंत नसल्याने अपघाताची तीव्रता वाढल्याचे सांगण्यात येत आहे. या भीषण अपघातात राहुल ठाकरे आणि प्रीतम प्रधान यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या बाबाराव टेकाम यांचा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला. दत्तू मेश्राम, प्रतीक आडके. आणि यशवंत पाटील यांना दुखापत झाली. त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. अपघाताची माहिती भाविकांनी ११२ क्रमांकावर दिल्यानंतर पोलीस निरीक्षक देविदास चोपडे आणि पोलीस कर्मचारी अपघातस्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या मदतीने जखमींना दरीतून बाहेर काढून ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरीत पडलेले मृतदेह बाहेर काढणे आव्हानात्मक ठरले. पोलीस निरीक्षक चोपडे यांनी पत्रकार इलियास बावाणी आणि पत्रकार गोपाल चव्हाण यांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून ग्रामीण रुग्णालयात पोहोचविले. शारदा कन्स्ट्रक्शनचे सुपरवायझर श्रीनिवास यांनी तातडीने क्रेन उपलब्ध करून दिल्याने दरीत कोसळलेला टेम्पो बाहेर काढण्यात आला. पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके, पोलीस हवालदार सत्यमल मडावी, पोलीस कर्मचारी संघरत्न सोनसळे व पवन राऊत तसेच होमगार्ड एस. पी. भगत आणि मुरकुटे पुढील तपास करीत आहेत. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर माहूर गडावर भाविकांची मोठी वर्दळ असताना घडलेल्या या दुर्घटनेने घाटरस्त्यावरील सुरक्षित प्रवासाचा प्रश्न गंभीर बनला आहे. घाटातील धोकादायक वळणांवर संरक्षक कठडे, मजबूत भिंती, दिशादर्शक फलक आणि रात्रीच्या वेळी वाहनचालकांना सुरक्षितपणे प्रवास करता यावा यासाठी आवश्यक उपाययोजना आहेत की नाहीत, याची संबंधित विभागाने तातडीने पाहणी करणे गरजेचे आहे.

## आ.सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ
# उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांची शनिवारी जाहीर सभा



नांदेड/प्रतिनिधी-मराठवाडा पदवीधर विधानपरिषद मतदारसंघ निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप-शिवसेना महायुतीचे उमेदवार आ.सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांची जाहीर सभा शनिवार दि.१७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेचार चाजता कै.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे आयोजित करण्यात आली आहे.

या जाहीर सभेच्या अध्यक्षस्थानी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोक चव्हाण हे राहणार आहेत. राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे, नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, राज्याच्या आरोग्य राज्यमंत्री ना.मेघनाताई बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून खा.डॉ. अजित गोपछडे, खा.नागेश पाटील आष्टीकर, आ.हेमंत पाटील, माजी मंत्री डी.पी.सावंत, आ.भीमराव केराम, आ.डॉ.तुषार राठोड, आ.राजेश पवार, आ.जितेश अंतापूरकर, आ.बालाजी कल्याणकर, आ.श्रीजयाताई चव्हाण, आ.आनंदराव बोंढारकर, आ.बाबुराव कदम कोहळीकर, महापौर कविता मुळे यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित राहणार आहेत. या जाहीर सभेला महायुतीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सभेच्या संयोजकांनी केले आहे.




छत्रपती संभाजीनगर मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार दिलीप हरिभाऊ घुगे यांच्या प्रचारार्थ लोहा येथे आयोजित जाहीर सभेला विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा.पुरुषोत्तम धोंडगे, सतीश पाटील उमरीकर, महेश खेडकर, प्रकाश मारावार व इतर उपस्थित होते.

# बालमृत्यू रोखण्यासाठी दुर्गम भागातील आरोग्य यंत्रणेने सतर्क राहावे-महेश पाटील

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. माता-बालमृत्यू रोखण्यासाठी तसेच बालकांचे आरोग्य आणि पोषण सुधारण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक सतर्क राहून नियमित क्षेत्रीय निरीक्षण करावे, असे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली गाभा समितीची आढावा बैठक झाली. या बैठकीत किनवट व माहूर तालुक्यांतील दुर्गम भागातील आरोग्यसेवा, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम,माता-बाल आरोग्य,कुपोषण प्रतिबंध आणि विविध आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत किनवट व माहूर तालुक्यांतील प्रत्येक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करावी. आजारी विद्यार्थ्यांना तातडीने उपचार, समुपदेशन आणि आवश्यकतेनुसार पुढील उपचारांसाठी संदर्भसेवा उपलब्ध करून द्यावी. हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असलेल्या गर्भवती व मातांची स्वतंत्र यादी तयार करून त्यांची नियमित तपासणी, औषधोपचार आणि शासकीय योजनांचा लाभ सुनिश्चित करावा, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी दिल्या. या बैठकीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नेवले, महिला व बालकल्याण अधिकारी डॉ.प्रशांत थोरात, आरोग्य सेवा उपसंचालक (कुष्ठरोग) डॉ. बालन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रतिनिधी, किनवट व माहूरचे तालुका आरोग्य अधिकारी तसेच आरोग्य विभागाचे विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# दिल्ली पोलिसांनी अभिजीत दिपकेंना ताब्यात घेतले




नवी दिल्ली:सीजेपीच्या 'लहरा दो तिरंगा' आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीमध्ये मोठा राडा झाल्याचं दिसत आहे. कनॉट प्लेसमधील सेंट्रल पार्ककडे निघालेल्या अभिजीत दिपके यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. सीजेपीच्या आंदोलनाला परवानगी नाही, असं कारण देत दिल्ली पोलिसांनी अभिजीत दिपकेंना ताब्यात घेतलं आहे.

त्या आधी दिल्ली पोलिसांनी अभिजीत दिपके यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना आंदोलन न करण्याबाबत नोटीस दिली होती. त्यानंतर आंदोलन स्थळी जाताना दिल्ली पोलिसांनी अभिजीत दिपके यांना ताब्यात घेतल्यानं वातावरण चांगलंच तापलं आहे. कॉकरोच जनता पार्टीचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांकांच्या अटकेविरोधात पुन्हा एकदा सीजेपी मैदानात उतरली आहे. दिल्लीत आज लहरा दो तिरंगा आंदोलनाची हाक देण्यात आली होती. संध्याकाळी पाच वाजता कनॉट प्लेसमधील सेंट्रल पार्कमध्ये तिंरगा रॅलीसाठी जमण्याचं आवाहन सीजेपीनं केलं होतं. मात्र त्याआधीच कॅनॉट प्लेस आणि आजूबाजूच्या परिसरात निर्बंध लागू करण्यात आले. त्यावर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांना वाचवण्यासाठी पंतप्रधान अवघी दिल्ली ठप्प करत आहेत अशा शब्दात सीजेपीने भाजपला लक्ष्य केलं. दरम्यान, सीजेपीच्या 'लहरा दो तिरंगा' आंदोलनामध्ये सहभागी होण्यासाठी निघालेल्या अभिजीत दिपके यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं. दिपकेंना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर सीजेपीचे पोलीस आक्रमक झाल्याचं दिसून आलं.

# मन्याड नदीत कार कोसळली;पत्नीचा मृत्यू,पती बचावला

## पुलाच्या सुरक्षा कठड्यांची दुरवस्था;सा.बां.विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह






कंधार/प्रतिनिधी-तालुक्यातील बहादरपुरा येथील मन्याड नदीवरील पुलाची दुरवस्था वाहनधारकांच्या जिवावर बेतत असल्याचे समोर आले आहे. गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास नदीच्या पुलावरून वाहन नदीत कोसळून झालेल्या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला आहे. मयत महिलेचा पती अपघातातून बचावले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मुखेड तालुक्यातील सावरगाववाडी येथील रहिवासी पार्वतीबाई गुट्टे (वय ४२ ) आणि त्यांचे पती लक्ष्मण गुट्टे हे नांदेड येथून सावरगाववाडीकडे जात होते. गुरुवार दि.१५ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे बारा ते एक वाजण्याच्या दरम्यान बहादरपुरा येथील मन्याड नदीवरील पुलावरून जात असताना त्यांचे वाहन नदीत कोसळले. या दुर्घटनेत पार्वतीबाई गुट्टे यांचा मृत्यू झाला. लक्ष्मण गुट्टे यांना पोहता येत असल्याने ते सुखरूप बाहेर निघाले. लक्ष्मण गुट्टे यांनी या घटनेची माहिती कंधार पोलीस ठाण्याला दिली. घटनास्थळी पोलीस अधिकारी व कर्मचारी तात्काळ पोहचले. त्यांनी स्थानिकांच्या मदतीने नदीत कोसळलेले वाहन बाहेर काढण्यात आले.

बहादरपुरा येथील मन्याड नदीवरील पुलाच्या दोन्ही बाजूंचे सुरक्षा कठडे तुटलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळी या पुलावरून प्रवास करणे धोकादायक ठरत आहे. यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलावरील वाहतूक बंद केली होती. मात्र, पुन्हा वाहतूक सुरू झाल्यानंतर हा अपघात घडल्याने पुलाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. पुलावरील पान ४ वर

# इतवारा पोलीसांच्या हद्दीतील मटका अड्डयांवर पोलीसांच्या धाडी

नांदेड/प्रतिनिधी-इतवारा पोलीस स्टेशनच्या हद्दीत सुरु असलेल्या मटका अड्डयांवर पोलीसांनी धाडी टाकुन आठ जणांना अटक करण्यात आली आहे.

नांदेड शहरात मटका व जुगाराचे क्लब पूर्णपणे बंद झाल्याचा दावा आता फोल ठरला आहे. इतवारा पोलीस स्टेशनच्या हद्दीत सुरु असलेल्या मटका अड्डयांवर धाडी टाकण्यात आल्या आहेत. शादाब हॉटेल जवळ पोलीसांनी सुरु असलेल्या मटका अड्डयावर बुधवारी रात्री धाड टाकुन गोपाळ शर्मा रा.जुना मोंढा, नांदेड यास अटक करण्यात आली. त्याच्याकडून रोख रक्कम व दोन मोबाईल असा ३५ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. गुरुवारी सायंकाळी सिटीझन गल्ली भागातील मटका अड्डयांवर पोलीसांनी छापा टाकला. पैसे घेवून लोकांकडून कल्याण नावाचा मटका खेळवित असतांना शेख फेरोज शेख शौकत रा.पाकिजानगर, नांदेड व इतर पाच जणांना अटक केली. त्यांच्याकडून रोख रक्कम, तीन मोबाईल असा २२ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला. पान ४ वर

# लाच नेमकी कशासाठी ?



अंकुश शिंगाडे
नागपूर

लाचलुचपत हा प्रकार काही नवीन नाही. लाच घेतल्याशिवाय कोणालाही जमतच नाही. त्याशिवाय कामं होत नाही. लाच जर दिली तर लवकर कामे होतात. तसं पाहिल्यास सर्वात जास्त लाच ही अधिकारी वर्ग घेत असतात. मग ते पोलीस विभागातील असो वा महसूल विभाग असो वा कृषी विभाग असो. साधे कृषी विभागातील तलाठी हे गरीब शेतकऱ्यांकडून लाच घेवून त्यांना सातबारा देत असतात. तसं पाहिल्यास संबंधीत व्यक्तींना भरपूर वेतन व भत्ते असतात. तरीही लाच घेतली जाते. ज्या लाचेतून न्यायपालिकेतील कर्मचारीही सुटलेले नाहीत. अगदी न्यायालयीन न्यायाधीश सुद्धा. निकालचे निकालही अगदी लाचेनं बदलवले जातात. ही वास्तविकताच आहे. लाच ही एक रुपयापासूनही सुरु होत असते.

म्हटलं जातं की पोलीस हे लाच घेतात आणि लाच घेवूनच एखाद्या प्रकरणाचा लवकर छडा लावतात. जो लाच देत नाही. त्याची प्रकरणं तशीच प्रलंबीत राहतात. कधी रस्त्यावर गाडी चालवतांना लाच घेवून लवकर गाडी सोडली जाते. लाच जर दिली नाही तर जबरन व जास्त दंड बसतो. परंतु हा दंड सरकारी खजिन्यात जातो. लोकँ आपला पैसा वाचावा म्हणून असा दंड देत नाहीत. लाच देतात. ज्यातून कोणतंही प्रकरण कमी पैशात निपटतं. रस्त्यावरुन वाहने चालवितांना लाच घेणे. यातूनच पोलिसांचा धाक निर्माण होतो व अशा लाचेच्या स्वरुपात पैसा द्यावा लागतोय म्हणून लोकँ आपल्या गाडीची कागदपत्रे रस्त्यावरुन गाडी चालवतांना व्यवस्थित ठेवतात व वाहने देखील व्यवस्थित चालवीत असतात. गुन्ह्याच्या बाबतीत सांगायचं झाल्यास लाचेनं अतिशय कमी दरात प्रकरण निपटवलं जातं. काही काही किरकोळ गुन्ह्यांची नोंद होत नाही. लाचेसाठी पैसा मोजावा लागत असल्यानं लोकांचं मन तळमळतं व लोकँ विचार करतात की सर्व पाहावं, परंतु पोलीस स्टेशनचे दरवाजे पाहू नये. ज्याची परियंती गुन्हे कमी प्रमाणात घडण्यात होते व गुन्हे कमी प्रमाणात घडतात. याचाच अर्थ असा की लाचेच्या स्वरुपात भ्रष्टाचार जरी होत असेल, तरी लाचेच्या रुपानं गुन्हे कमी व्हायला एकापरीने मदतच होत असते.

न्यायालयातही तसंच घडतं. न्यायालयातही वकीलांचे फीचे शुल्क जास्तच असते. सरकारी वकीलही लाच घेत असतात कधीकधी. कधी कधी न्यायाधीशही लाच घेतात व सर्रास निकाल बदलवले जातात. ज्यातून न्याय व्यवस्थित मिळत नाही. मग विचार येतो की मी यापेक्षा न्यायालयात आलो नसतो तर बरे झाले असते. तीच मानसिकता व तीच मानसिकता ही इतरत्र पसरते. ज्यातून सामान्यातील बरीचशी माणसं न्यायालयाच्या वाट्याला जात नाहीत. ज्यातून गुन्हे कमी व्हायला मदतच होत असते.पोलीस हे देशातील नागरिकांचे रक्षक असतात. भक्षक नसतातच. त्यांनी जर आपलं कर्तव्य बरोबर केलं तर खरंच देश सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही. शिवाय त्यांच्याच कृपेने देश सृजलाम सुफलाम आहे. आजच्या काळात घरादारात, शाळेत तसेच परीसरात कोणावरही रागावता येत नाही. कोणाच्या अधिकाराचं हनन करता येत नाही. नियम व्यवस्थित पाळावे लागतात. ते पाळले नाही तर कारवाई होते. ज्यातून गुन्हे घडतात व गुन्हे घडलेच तर लाचेतून गुन्ह्यांवर पळवाट शोधली जाते. त्यादृष्टीनं लाचलुचपत महत्वाची ठरते. परंतु कधीकधी लाच ही संबंधीत प्रकरणाला न्याय देत नाही. तेव्हा विचार येतो की याक लाचेनं माझं सर्वकाही बिघडवलं. कधीकधी लाच ही आपली बाजू खरी असतांनाही मागितली जाते. तेव्हा तर फारच चीड येत असते.

असंच एक प्रकरण. एके ठिकाणी एक मुलगी घरातून निघून एका मैत्रीणीकडे गेली. तिथं ती रात्रभर राहिली. परंतु जातांना तिची परिस्थिती नसल्यानं फोन नव्हता व ती ज्या मैत्रीणीकडे राहायला गेली. तिच्याकडेही फोन नव्हता. त्यामुळं संवाद झाला नाही. मग काय, आजच्या काळातील सायबर क्राईमच्या प्रथेनुसार पालकांना वाटलं की तिचं कोणी अपहरण केलं असावं.ते अपहरण...अपहरणाचा विचार मनात येताच तो परीवार घाबरला व त्यांनी त्या प्रकरणाची तक्रार पोलीस स्टेशनला टाकली. आजच्या काळात केव्हा काय होणार व काय घडलं असेल, याचा विचार करता येत नसल्यानं साहजीकच परीवाराचं घाबरणं साहजीक आहे. मग काय, चौकशी सुरु झाली व चौकशीनंतर ती मुलगी त्या मैत्रीणीकडे सापडली. ज्यात पोलिसांनी आपलं कर्तव्य पार पाडलं. परंतु हा कर्तव्य पार पाडल्याचा मुद्दा. हाच मुद्दा विचारात घेवून ज्या पोलीस अधिकारी साहेबानं चौकशी केली. ते म्हणाले की मी स्वतः चौकशी केली. मी जास्त मेहनत केली. म्हणूनच तुमची मुलगी मिळाली. मग काय, मी जास्त प्रयत्न केल्यामुळे मला आपणाकडून खर्चपाणी हवाय. अर्थात रक्कम हवीय. ज्याला आपण आपल्या भाषेत लाच म्हणतो. ती रक्कम दिली नाही तर वेगवेगळ्या कलमा लावू व तुम्हाला फसवू. हीच गोष्ट कधीकधी रस्त्यावरुन गाडी चालवितांनाही घडत असते.

ती रक्कम...गुन्हा नसतांना पोलिसांनी मागीतलेली रक्कम. जर ती रक्कम न दिल्यास आपली केस कोर्टात दाखल करु. वेगवेगळ्या कलमा लावू. अशी पोलिसांनी दिलेली धमकी. कुठंतरी नक्कीच पाणी मुरत असल्याचा संकेत मिळतो. म्हणूनच देशात कायदे आहेत. परंतु सुव्यवस्था चोख नसल्याने देशात गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. आजच्या काळात काही पोलीस कर्मचारी जर सोडले तर बरेचसे कर्मचारी हे लाच लुचपत घेत असतात. ज्यातून नागरिकांमध्ये दहशत निर्माण होते. जी रक्कम साधारणतः गरीब परीवारातील मंडळी देवू शकत नाहीत. ज्यातून अशा गरीब परीवाराला कोर्टातील खटल्याला सामोरे जावे लागते. तरीही लाचेची रक्कम न दिल्यानं न्याय मिळत नाही. लाच म्हणून का असेना, जो जास्त प्रमाणात रक्कम देईल. त्याला लवकर न्याय मिळेल. कधीकधी तारखा लावण्यासाठीही वकीलांच्या पीएला लाच द्यावी लागते.पोलीस देशाचे रक्षण करणारे रक्षकच असतात. ते भक्षक नसतात. ते आहेत म्हणून न्यायव्यवस्था चोखंदळ आहे. चांगली मातब्बर गुन्हे करणारी मंडळी ही अशा पोलिसांच्या धाकाच्या कधी वाट्याला जात नाहीत. परंतु असं जरी असलं तरी काही खटल्यात बऱ्याचशा साधारण परीवारातील लोकांना खटल्याला सामोरे जावेच लागते नव्हे तर परिस्थिती योग्य नसूनही खटले लढावेच लागतात.

आज पोलीस लाचलुचपत घेतांना पकडले जातात. काही निलंबीतही होतात. परंतु पोलिसांची लाचलुचपत काही बंद होत नाही. तीच गोष्ट इतरही विभागाची आहे. आज सर्वसाधारणपणे विचार केल्यास रस्त्यावरुन वाहने चालवीत असतांना कितीतरी वाहनांना थांबवून फोटो काढले जातात व त्यांना कारवाई करण्याचा धाक दाखवून बऱ्याच लोकांकडून पैसे वसूल केले जातात. जर लाचेची रक्कम दिली तर काढलेला व्हिडिओ देखील डीलीट करु असे सांगून लाचेची रक्कम मिळताच असे व्हिडिओ डिलीट केले जातात. ही वास्तविकताच आहे व असा अनुभव प्रत्येकाच्या वाट्याला येतच असतो.महत्वाचं सांगायचं झाल्यास पोलीस प्रशासन हे जे काही कार्य करतं. ते वाखाणण्याजोगंच असतं. परंतु पोलीस विभागातील काही तांदळातील खड्यासारख्या लोकांच्या संदिग्ध अशा विशिष्ट भुमिकेमूळे पोलीस विभाग आज बदनामीचा डाग भोगत आहे. तसं पाहिल्यास पोलीस विभाग बदनाम नाहीच. तो चांगला विभाग आहे, म्हणूनच अंतर्गत सुरक्षा व सुरक्षितता आहे. तो जर विभाग चांगला नसता तर अंतर्गत सुरक्षितता नसतीच. हे नाकारता येत नाही.

विशेष म्हणजे पोलीस पैसे घेतांना जो धाक दाखवितात. हा धाक म्हणजेच गुन्हे कमी करणे आहे. तो धाक म्हणजेच गुन्ह्यांना रोखथाम आहे. त्या धाकानंतर आवश्यक लाचलुचपत पद्धतीचे आश्वासन पुर्ण न झाल्यास होणारी कारवाई, यात गुन्हे बंद करण्याची वा ते गुन्हे संपुष्टात आणण्याची ताकद आहे. हाही एक विचार करायला लावणारा प्रश्न आहे. खरं तर ही लाचलुचपत घेण्याचा प्रकार, हा धाक का असेना, परंतु गुन्ह्यांना रोखथाम करणारी गोष्ट आहे. कारवाईच्या दृष्टीनं लाचलुचपत पद्धतीच्या अनुषंगाने दिलेल्या कारवाईचा धाक. ज्यातून गुन्हे जर कमी होत असेल तर असा धाक अतिशय कामाचा आहे. कदाचित अशाच प्रकारच्या धाकानं रस्त्यावर वाहने चालवतांना लोकँआपल्या वाहनांची व्यवस्थित कागदपत्रे ठेवू शकतील. सुरक्षित वाहने चालवू शकतील. ज्यातून रस्त्यावरील अपघात होणार नाही. त्यांचे प्रमाण कमी होईल. तसेच अशा धाकानं देशातील गुन्हेगारीही कमी व्हायला मदत होईल,हे तेवढंच खरं.

# मानवी जीवनाचे चार आधारस्तंभ



दत्ता तुमवाड
नांदेड

लोकशाहीचे जसे चार आधारस्तंभ आहेत, तसे मानवी जीवनाचेही चार आधारस्तंभ आहेत. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ आणि प्रसारमाध्यमे या चार आधारस्तंभांपैकी एक जरी लंगडा झाला, तरी लोकशाही अपंग होते. माणसाला दोन पाय आणि दोन हात या चार अवयवांपैकी एक जरी मोडला, तर माणूस अपंग होतो. याचप्रमाणे माणसाच्या जीवनाचे बुद्धी, श्रम, वेळ, संपत्ती (पैसा) हे चार आधारस्तंभ आहेत. यांपैकी एकाचाही वापर झाला नाही, किँवा दुरुपयोग केला, वा वेळ निष्फळ वाया घालविला, तरी माणसाचे जीवन अधुरे, अपंग आणि निष्फळ होते.

कुठे, कसा आणि किती या चार गोष्टींचा वापर करायचा, याचे भान आणि तारतम्य ज्या माणसाला नाही, त्याचे जीवन निरर्थक होते. त्याच्या जीवनाला काही अर्थ नसतो. अशा माणसाचे जगणे वेडेपणाचे होते. बुद्धी, श्रम, वेळ, संपत्ती या गोष्टी अमूल्य आणि मौल्यवान आहेत. त्यांचा जर गैरवापर झाला, नको तिथे आणि नको त्यासाठी खर्च केला, तर मानवी जीवन जगणे खडतर होते. अशा माणसाला आयुष्यात अनेक खस्ता खाव्या लागतात, अनेक अडचणी उद्भवतात आणि त्यांना तोंड द्यावे लागते. अशा माणसाचे सारे आयुष्य दुःखमय होते. सुखाला पारखे व्हावे लागते. म्हणून बुद्धी, श्रम, वेळ, धनसंपत्ती या अमूल्य गोष्टींचा विचारपूर्वक आणि जपून वापर केला पाहिजे. या गोष्टींचा कशासाठी वापर करायचा, याचे माणसाला ज्ञान आणि भान असायला पाहिजे. काल्पनिक, भासमान, चमत्कारिक गोष्टींवर या चार गोष्टींचा वापर करू नये, तर ज्या वास्तविक, सत्य आणि व्यावहारिक आहेत, अशाच गोष्टींसाठी या चार आधारस्तंभांचा वापर केला पाहिजे. असे करण्यासाठी विवेक कामी येतो. विवेकबुद्धीचा, प्रज्ञाबुद्धीचा आधार घेतला पाहिजे, तरच बुद्धी, श्रम, वेळ, धनसंपत्ती या अमूल्य, मौल्यवान गोष्टी व्यर्थ वाया जाणार नाहीत.

स्वर्ग, मृत्यू, पाताळ, दैव, पुनर्जन्म, मोक्ष, कर्मकांड या साऱ्या अंधश्रद्धा आहेत. यांचे पालन करणे म्हणजे जागेपणी स्वप्नात जगणे होय. स्वप्नातील जगणे खोटे असते. काल्पनिक जगात वावरणे वेडेपणाच असते. अज्ञान आणि वेडेपणात माणूस भावनाशील होतो आणि तो देवाऐवजी माणसालाच, त्याच्या अवताराला, त्याच्या पुत्राला, दूताला आणि कधी कधी तर स्वतःलाच देव समजतो. एवढेच नाही, तर प्रत्येक जीवमात्रात आत्मा आहे, ही कल्पना करून पशुपक्षी, माणूस यांनाच ईश्वर मानतो. एवढेच नाही, तर निर्जीवातसुद्धा, म्हणजेच दगडातसुद्धा देव आहे, असे मानून मनाचे समाधान करून घेतो. परंतु वस्तुतः हे सारे खोटेच असते. यात सत्य काहीच नसते. हा सारा बालबुद्धीचा खेळ आहे. लहान मुलाची समजूत घालण्यासारखे होय. असे का घडते? याचे कारण विवेकबुद्धीचा वापर न केल्यामुळे. धर्मगुरू, धर्माचे ठेकेदार, देवाचे दलाल यांच्यावर विश्वास ठेवल्यामुळे, बाबा वाक्यं प्रमाणम् अशी श्रद्धा बाळगल्यामुळे असे घडते.अशा श्रद्धेपोटी माणूस आपला अमूल्य वेळ, बुद्धी, श्रम, पैसा, संपत्ती निकामी वाया घालवतो आणि अंधश्रद्धांचे जाळे पसरवतो. आपले आर्थिक नुकसान आणि शोषण करून घेतो, गुलामी प्रवृत्ती जोपासतो. यामुळेच त्याचे जीवन दुःखमय होते. जीवनाचा आधार असलेल्या या अमूल्य गोष्टींचा योग्य विचार आणि वापर न केल्यानेच ही विषमतेची व्यवस्था आणि सरकार निर्माण झाले. परिणामी, ही व्यवस्था माणसाची बुद्धी मंद करते, माणसाच्या वेळेचा अपव्यय करते, श्रमाचे शोषण करते, पैसा वाया जातो. यातून मानवी जीवन फुलण्याऐवजी सुकून जाते.

# ललिता पंचमीला गोपाल गावंडेंच्या सुरेल स्वरांची मेजवानी;माहूर गडावर रात्रभर भक्ति संगीताचा जागर

## भावगीत,भक्तिगीत,गोंधळ,भारुड आणि पोवाड्यांनी रंगली संगीत सेवा

माहूर/प्रतिनिधी- महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी पूर्ण शक्तिपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माहूरगडावरील श्री रेणुका देवीच्या शारदीय नवरात्रोत्सवात ललिता पंचमीच्या निमित्ताने गुरुवारी (ता.१५) रात्री भक्तिसंगीताचा जागर रंगला. टीव्ही स्टार आणि सूर नवा ध्यास नवा या संगीत कार्यक्रमाचा २०२३ मधील विजेता गायक गोपाल गावंडे यांनी आपल्या सुमधुर आवाजात भावगीते आणि भक्तिगीते सादर करून उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. विविध कलावंतांच्या गायन, नृत्य आणि पारंपरिक लोककलांच्या सादरीकरणाने हा सोहळा भक्तिरसात न्हाऊन निघाला. रात्रभर चाललेल्या या संगीत सेवेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




गुरुवारी सायंकाळी सहा वाजता विश्वस्त चंद्रकांत भोपी आणि पुणे येथील भरतनाट्यम कलावंत भक्ती पांडव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी विश्वस्त संजय कान्नव, आशिष जोशी, विनायकराव फांदाडे, दुर्गादास भोपी, व्यवस्थापक विजय राऊत, योगेश साबळे, अरविंद राठोड आणि नितीन गेडाम उपस्थित होते. पुणे येथील भक्ती पांडव व त्यांच्या संचाने भरतनाट्यम नृत्य सादर करून संगीत सेवेची सुरुवात केली. त्यानंतर नांदेड येथील कुमारी रागेश्री रमाकांत जोशी यांनी गोंधळ आणि भारूड सादर केले. प्रख्यात शाहीर प्राचार्य डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी पोवाड्याच्या माध्यमातून उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण केला, तर यवतमाळ येथील साची भुसार आणि लोकेश मडावी यांनी गोंधळावर नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. यानंतर अकोला येथील टीव्ही स्टार गायक गोपाल गावंडे यांनी आपल्या बहारदार गायनाने ललिता पंचमीच्या संगीत सेवेची रंगत वाढवली. अबीर गुलाल उधळीत रंग, नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग, माझे माहेर पंढरी आहे भिवरेच्या तीरी, मोरया मोरया गणपती बाप्पा मोरया, होईन भिकारी पंढरीचा वारकरी, हरी म्हणा, कुणी गोविंद म्हणा, कुणी गोपाळ म्हणा नारायणा, दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा, वेदांनाही नाही कळला अंतपार याचा, कानडा राजा पंढरीचा आणि मन लागो रे लागो गुरु भजनी अशा लोकप्रिय रचना सादर करत त्यांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या प्रत्येक गीताला भाविकांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. यानंतर अमोल पटवर्धन, गुंजन शिरभाते, रवी सातफळे, प्रसन्न जोशी, राहुल मानेकर, जाई देशपांडे, श्रीकांत पिसे, दलितानंद खडसे आणि ज्ञानेश्वर टेकाळे यांनीही श्री रेणुका देवीच्या दरबारात सुरेल गायन सेवा अर्पण केली. या कार्यक्रमाचे संचलन प्राचार्य डॉ. मार्तंड कुलकर्णी, वेदशास्त्री निलेश केदार गुरुजी आणि सुरेश पाटील यांनी केले. ललिता पंचमीचा जागरण सोहळा असल्याने श्री रेणुका देवीचे मंदिर रात्रभर भाविकांच्या दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले होते. त्यामुळे हजारो भाविकांनी देवीचे दर्शन घेतले, तसेच भक्तिसंगीताच्या सुरेल मेजवानीचा आनंद लुटला. भक्ती, संगीत आणि पारंपरिक लोककलांचा सुंदर संगम घडविणारा हा जागरण सोहळा माहूरगडावरील नवरात्रोत्सवातील एक विशेष आकर्षण ठरला.

# जिल्हास्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धेत सरस विद्यालयाची दमदार कामगिरी



मांडवी/प्रतिनिधी- शासनाच्या क्रीडा विभागांतर्गत आयोजित शालेय क्रीडा स्पर्धेत मांडवी येथील सरस इंग्रजी माध्यम विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. १२ ऑक्टोबर रोजी नांदेड येथे झालेल्या जिल्हास्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धेत विद्यालयाच्या चौदा वर्षांखालील मुलांच्या संघाने अंतिम फेरीत द्वितीय क्रमांक पटकावत यश संपादन केले.

विद्यार्थ्यांनी सांघिक कौशल्य, जिद्द आणि उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत स्पर्धेत आपली छाप पाडली. त्यांच्या या यशामुळे सरस विद्यालयासह पालक, मांडवी परिसर आणि संपूर्ण किनवट तालुक्याचा नावलौकिक जिल्हास्तरावर उंचावला आहे. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीमुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला नवी प्रेरणा मिळाली आहे. या यशाबद्दल इंदिराबाई राठोड ट्रस्ट, मांडवीचे अध्यक्ष गंगन्नाजी नेम्मानिवार, सचिव नितीनभाऊ राठोड, माधवजी श्रीमनवार तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यालयाच्या दोन्ही माध्यमांचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून पुढील क्रीडा स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# अनुसया ढगे साखर कारखान्याचा ११ नोव्हेंबर रोजी गळीत हंगाम-दादाराव ढगे

## सभासदांना ३ हजार ८०० तर बिगर सभासदांना साडेतीन हजार रुपये दर जाहीर

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुक्यातील पिंपळकौठा येथील अनुसया सावजी ढगे साखर कारखान्याचे गळीत हंगाम येत्या दि.११ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. कारखान्याचे प्रमुख दादाराव पाटील ढगे यांनी शेलगाव येथील जाहीर सभेत ऊसदराची घोषणा केली. कारखान्याच्या सभासदांना प्रतिटन ३ हजार ८०० रुपये, तर बिगरसभासदांना प्रतिटन साडेतीन हजार रुपये ऊसदर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या घोषणेमुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ऊसदर जाहीर करण्यासोबतच दादाराव पाटील ढगे यांनी कारखान्यात वजनकाट्या बाबत पारदर्शकता ठेवण्याची ग्वाही दिली. कारखान्यावर ऊस देताना आणि इतर व्यवहारांसाठी एकच वजनकाटा वापरण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. वजनकाट्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ देणार नाही, तसेच मापात पाप करण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. कारखान्याचा गाळप हंगाम सुरू करताना उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते गाळपाचा शुभारंभ करण्यात येणार असल्याची




माहितीही सभेत देण्यात आली. मुदखेड तालुक्यासह भोकर विधानसभा मतदारसंघातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा कारखाना सुरू होणे महत्त्वाचे मानले जात आहे. स्थानिक पातळीवर ऊस गाळपाची सुविधा उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, कारखान्याच्या प्रारंभामुळे परिसरातील आर्थिक आणि राजकीय समीकरणांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आगामी काळात या कारखान्याची भूमिका आणि शेतकऱ्यांना मिळणारा प्रत्यक्ष लाभ यावर स्थानिक राजकीय घडामोडींची दिशा ठरणार का, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. ऊस दराची घोषणा, वजनकाट्यात पारदर्शकतेचे आश्वासन आणि गाळप सुरू करण्याची निश्चित तारीख यामुळे अनुसया सावजी ढगे ग्रो कारखान्याने परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

# जुन्या वादातून तरुणावर प्राणघातक हल्ला

नांदेड/प्रतिनिधी-जुन्या वादातून एका तरुणावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना बुधवारी रात्री शहरातील जयभीमनगर भागात घडली आहे.

आर्यन दिलीप भदरगे (वय १९) रा.जयभीमनगर,नांदेड हा बुधवारी रात्री ८ च्या सुमारास जयभीमनगर भागातील बुद्ध विहारा जवळ थांबला असतांना नागसेन उर्फ नाग्या गायकवाड रा.आंबेडकरनगर, प्रमोद सोनकांबळे उर्फ मोन्या जट रा.सावित्रीबाई फुलेनगर, लक्की आगबोटे रा.जयभीमनगर व प्रेम सोनकांबळे रा.सावित्रीबाई फुलेनगर,नांदेड हे चार जण त्या ठिकाणी आले. जुन्या वादातून आर्यन भदरगे यास शिवीगाळ करुन मारहाण करण्यास सुरुवात केली. भदरगे याच्या पाठीवर, छातीवर चाकुने वार करुन गंभीर जखमी केले. तसेच त्याच्या मित्राच्या घरात जावून त्याच्या आईचा गळा पकडला. घरातील साहित्याची नासधुस करुन पंधरा हजार रुपयाचे नुकसान केले. आर्यन भदरगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात चार जणांविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी घटनेतील एका आरोपीस पोलीसांनी अटक केली असून तीन जण फरार आहेत. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक काचमांडे हे करीत आहेत.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नांदेड व जालना येथून विशेष रेल्वे धावणार

नांदेड/प्रतिनिधी-नागपूर येथे २० ऑक्टोबर २०२६ रोजी होणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यासाठी जाणाऱ्या प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता, दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड-नागपूर आणि जालना-नागपूर दरम्यान विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे.



नांदेड-नागपूर विशेष गाडी (०७०८५) १९ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता सुटून विविध मार्गांनी २० ऑक्टोबर रोजी सकाळी १०.२५ वाजता नागपूरला पोहोचेल, तर परतीच्या प्रवासासाठी नागपूर-नांदेड गाडी (०७०८६) २० ऑक्टोबर रोजी रात्री ११.५५ वाजता सुटून २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता नांदेडला येईल. या दोन्ही गाड्यांना प्रत्येकी १६ डबे असतील. तसेच, जालना-नागपूर विशेष गाडी (०७०८३) १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता सुटून २० ऑक्टोबर रोजी दुपारी १२.१० वाजता नागपूरला पोहोचेल. परतीच्या नागपूर-जालना गाडी (०७०८४) २१ ऑक्टोबर रोजी रात्री १ वाजता सुटून त्याच दिवशी दुपारी १२ वाजता जालना येथे पोहोचेल. या दोन्ही फेऱ्यांना १९ एलएचबी डबे जोडण्यात आले आहेत.

# कुंडलवाडी ग्रामीण रुग्णालयाच्या उद्घाटनाच्या हालचालींना वेग

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी येथील ग्रामीण रुग्णालय लवकरात लवकर सुरू करण्यासाठी प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय पेरके यांनी वैद्यकीय पथकासह ग्रामीण रुग्णालयाची पाहणी करून सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी रुग्णालयातील उर्वरित कामे, आवश्यक सोयी-सुविधा आणि रुग्णालय सुरू करण्यापूर्वी करावयाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. प्रलंबित कामे विनाविलंब पूर्ण करून रुग्णालय सुरू करण्यासाठी आवश्यक ती तयारी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना डॉ. पेरके यांनी संबंधितांना दिल्या. अवघ्या काही दिवसांत मंत्री महोदयांच्या हस्ते ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन करण्याच्या दृष्टीने नियोजन सुरू असल्याची माहिती मिळत असून, त्यापूर्वी सर्व आवश्यक कामे पूर्ण करण्यावर प्रशासनाचा भर आहे. ग्रामीण रुग्णालय सुरू



झाल्यानंतर कुंडलवाडी शहरासह परिसरातील नागरिकांना स्थानिक पातळीवर आरोग्यसेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. जिल्हा शल्य चिकित्सक व त्यांच्या पथकाने नगराध्यक्षाच्यां निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी गजानन कोटलावार हे उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी उपस्थित डॉक्टरांचा सत्कार केला.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अर्थसाहाय्य केल्याबद्दल संतुकराव हंबर्डे यांनी केले देवाभाऊंचे अभिनंदन

नांदेड/प्रतिनिधी-गेल्या पाच दशकांत अनुभवला नाही अशा भीषण दुष्काळाचे सावट महाराष्ट्रावर दाटले असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने पाणी, पीक आणि चारा नियोजना बरोबरच, उद्योगांना दिलासा देणाऱ्या उपाययोजना केल्या आहेत. राज्यातील ३०५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले असून शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांचे अग्रिम अर्थसहाय्य जमा करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल भाजपा नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सरकारचे अभिनंदन केले आहे.

दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीकरिता तगादा लावणाऱ्या यंत्रणांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सक्त तंबी दिली असून पिण्याचे पाणी आणि पुरेशा चारा उपलब्धतेसाठी ठोस उपाययोजनांद्वारे दुष्काळाशी दोन हात करण्याची तयारी करून फडणवीस सरकारने एक आदर्श उभा केला आहे. दुष्काळी तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्यात आले असून जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध व्हावा याकरिता चारा



देणाऱ्या पिकांचे नियोजन करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांकडून हमीभावाने चारा खरेदी करण्याचा निर्णय घेऊन जनावरांना जगविण्याची हमी सरकारने घेतल्याने शेतकऱ्यांनीही दुष्काळाचा सामना करण्यासाठी हातात हात घालून सरकारला साथ द्यावी असे आवाहनही त्यांनी केले. राज्यातील दुष्काळी स्थिती ही नैसर्गिक आपत्ती आहे. अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्वांनी सामूहिकपणे प्रयत्न करण्याची गरज असताना या प्रश्नावर विरोधकांकडून केले जाणारे राजकारण दुर्दैवी आहे, अशी खंतदेखील डॉ. हंबर्डे यांनी व्यक्त केली. राज्यात साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचा वीजपुरवठा मोफत आहे. कर्जवसुलीच्या तगाद्यातून शेतकऱ्यास दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रिम मदत मिळणार आहे, दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना सरसकट परीक्षा शुल्क माफ करण्यात येत आहे. याशिवाय राज्यातील दोन लाखांहून अधिक अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना दोन हजार रुपयांची भाऊबीज देऊन सरकारने कुटुंब प्रमुखाची जबाबदारी संवेदनशीलतेने पेलली आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना बारा हजार रुपयांच्या वार्षिक सन्मान निधीमुळे समस्याग्रस्त शेतकऱ्यांना सरकारकडून मोठा दिलासा मिळालेला आहे. यासाठी राज्याच्या तिजोरीतून सहा हजार कोटींहून अधिक निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याने बळीराजासाठी संवेदनशीलतेने मदतीचा हात पुढे करणाऱ्या महाराष्ट्रातील फढणवीस सरकारचे अनुकरण काँग्रेसशासित राज्यांनी केले पाहिजे असा सल्लाही डॉ.हंबर्डे यांनी दिला.

# जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी 'खेत बचाओ' अभियान

नांदेड/प्रतिनिधी-जमिनीचे आरोग्य सुधारणे, रासायनिक खतांचा संतुलित वापर, जलसंधारण आणि नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारच्या निर्देशानुसार २२ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत राज्यभर खेत बचाओ अभियान राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत हे अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना कृषी आयुक्तालयाकडून विभागीय व जिल्हास्तरीय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

या अभियानांतर्गत माती परीक्षणावर आधारित खतांचा वापर, पीक विविधीकरण, पीक अवशेषांचे योग्य व्यवस्थापन आणि शाश्वत कृषी पद्धतींबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्रे, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) आणि कृषी विद्यापीठांच्या समन्वयातून विविध उपक्रम राबविण्यात येतील.अभियानाच्या माध्यमातून तेलबिया, कडधान्ये आणि फलोत्पादन पिकांना प्रोत्साहन देण्यासह भात कापणीनंतर पडीक राहणाऱ्या क्षेत्राचा कार्यक्षम वापर करण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच पीक अवशेष व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करून पराटी व पेंढा जाळण्यापासून शेतकऱ्यांना परावृत्त करण्यात येणार आहे. सेंद्रिय व नैसर्गिक निविष्ठांचा वापर, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबतही प्रशिक्षण व प्रात्यक्षिके आयोजित केली जातील.

# जिल्ह्यात स्वयंचलित हवामान यंत्र बसवण्याच्या प्रक्रियेला गती मिळणार!

## खा.रवींद्र चव्हाण यांच्या मागणीची केंद्र सरकारने घेतली दखल

नांदेड/प्रतिनिधी-विंड्स प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान यंत्र बसवण्याची प्रक्रिया नांदेड जिल्ह्यात अत्यंत संथ गतीने सुरू असल्याबाबत खा.चव्हाण यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांना पत्र पाठवून याकडे लक्ष वेधले असता या पत्राची केंद्रीय कृषीमंत्र्यांनी अत्यंत गांभीयनि दखल घेतली असून, महाराष्ट्रात ही प्रक्रिया जलद गतीने राबवण्याचे निर्देश राज्य शासनाला दिले आहेत.

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या आणि फळबागांच्या नुकसानीची योग्य भरपाई मिळावी, यासाठी खा.रवींद्र चव्हाण यांनी महत्त्वपूर्ण पाठपुरावा केला आहे. वातावरणातील बदलांमुळे उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीत नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. मात्र, ग्रामपंचायत स्तरावर हवामान यंत्रे उपलब्ध नसल्याने या बदलांची अधिकृत व योग्य नोंद होत नाही. याचाच गैरफायदा घेऊन पीकविमा कंपन्या शेतकऱ्यांना हवामान आधारित पीकविम्याचा लाभ देण्यास तांत्रिक अडचणी निर्माण करतात. ही गंभीर बाब खा.रवींद्र चव्हाण यांनी केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. नांदेड जिल्ह्यात ही यंत्रे त्वरित बसवण्याची मागणी केली होती. खा.रवींद्र चव्हाण यांच्या पत्राला उत्तर देताना केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कळवले आहे की, या मागणीची योग्य दखल घेण्यात आली असून, या प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान यंत्र बसवण्या संदर्भातील प्रशासकीय प्रक्रिया तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश महाराष्ट्र शासनाला देण्यात आले आहेत. केला आहे.

# पत्रकार श्रीराम पाटील यांचा विशेष सन्मान

देगलूर/प्रतिनिधी-पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या समस्या आणि ग्रामीण भागातील विविध विषयांना सातत्याने वाचा फोडणारे पत्रकार श्रीराम पाटील यांचा विशेष सन्मान करून गौरव करण्यात आला.

ग्रामीण भागातील नागरिकांच्या अडचणी, शेतकऱ्यांचे प्रश्न, शासकीय योजनांची अंमलबजावणी, तसेच विविध प्रशासकीय समस्या जनतेसमोर आणण्याचे काम पत्रकार श्रीराम पाटील यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून केले आहे. गेल्या



अनेक वर्षांपासून पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रामाणिकपणे योगदान देत समाजातील विविध प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न केल्याबद्दल दै.गावकरीचे मुख्य संपादकाने पारितोषिक देऊन पत्रकार श्रीराम पाटील यांचा सन्मान करण्यात आला.


## जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज १५५९/२०२६
मिर्झा युसुफ व एक वि. निरंक
ने.ता.२३/११/२०२६

अर्जदार:-अर्जदार - १. मिर्झा युसुफ बेग पि. मिर्झा हामेद अली बेग, वय ३६ वर्षे, व्यवसाय - व्यापार, २. मिर्झा मुनावर बेग पि. मिर्झा हामेद अली बेग, वय ३४ वर्षे, व्यवसाय - व्यापार दोघे रा. घर क्र. ९-७-१४३९, रहेमत नगर, देगलुर नाका, नांदेड मो. ९८३४५९८३२३

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत बेग जबीन फातेमा भ्र. मिर्झा हामेद अली बेग यांचा मृत्यु दिनांक १६/०८/२०२६ रोजी नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ व २ हे मयताचे मुले आहेत. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ व २ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक २३/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



Notices-2

६ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, नांदेड यांचे न्यायालयात

## जाहीर प्रगटन

ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१३०१/२०२६
रामेश्वर पि.नानाराव भारसावडे विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत सुगाव खु.
नोटीस

अर्जदार :- सार्थक पि.रामेश्वर भारसावडे, वय १४ वर्षे, रा. सुगाव खु. ता. जि. नांदेड

विरुध्द

गैर अर्जदार :- ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय सुगाव खु.

जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार सार्थक पि.रामेश्वर भारसावडे, वय १४ वर्षे, रा. सुगाव खु.ता. जि. नांदेड सार्थक पि.रामेश्वर भारसावडे जन्म दिनांक मुलगा १३-०७-२०१२ रोजी सुगाव खु.येथे झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक २५-११-२०२६ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक १४-१०-२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

स्वाक्षरित/-
के.टी. कनिष्ठ लिपीक
६ वे न्यायदंडाधिकारी
प्रथम श्रेणी, नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी, नांदेड

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठ सदैव तत्पर:कुलगुरु डॉ.चासकर

## युवक महोत्सव ज्ञानतीर्थ २०२६



नांदेड/प्रतिनिधी-युवक महोत्सवाच्या माध्यमातून आपल्या विद्यापीठातून भविष्यात अनेक दिग्गज अभिनेते, अभिनेत्री आणि विविध क्षेत्रांतील नामवंत कलाकार घडावेत, हीच अपेक्षा आहे. युवक महोत्सवासारख्या उपक्रमांचे आयोजन करताना अनेकदा नैसर्गिक तसेच मानवनिर्मित संकटांचा सामना करावा लागतो. मात्र, कितीही संकटे आली तरी त्यांचा विद्यार्थ्यांच्या विकासावर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये, याची काळजी घेणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्था सदैव कटिबद्ध असून, त्यासाठी आम्ही कायम तत्पर आहोत, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सायन्स कॉलेज, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव ज्ञानतीर्थ २०२६ च्या उद्घाटन समारंभात अध्यक्ष-स्थानावरून ते बोलत होते. शुक्रवार, दि.१६ ऑक्टोबर रोजी साने गुरुजी मंचावर या महोत्सवाचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, चला हवा येऊ द्या फेम प्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील होते. याप्रसंगी माजी खा.डॉ. व्यंकटेश काब्दे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.डी.डी. पवार, डॉ. प्रशांत पेशकार, डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. संतराम मुंडे, डॉ. डी.एन. मोरे, डॉ. सुरेखा भोसले, डॉ. हनुमंत कँधारकर, संस्थेचे सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, डॉ. विजय पवार, सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. एल.पी. शिंदे, डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतीमेचे पुजन करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रम प्रारंभ झाला. अत्यंत साध्या पध्दतीने उदृघाटन समारंभ संपन्न झाला. यामध्ये तीन मान्यवरांचा सन्मान करण्यात आला, इतरांचे शब्दसुमनांने स्वागत करण्यात आले. कुलगुरू डॉ. चासकर पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही शैक्षणिक संस्थांची महत्त्वाची जबाबदारी आहे. युवक महोत्सवातून विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याची, आत्मविश्वास वाढविण्याची आणि स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची संधी मिळते. अशा उपक्रमांतूनच भविष्यातील प्रतिभावंत कलाकार घडत असतात. असे कुलगुरु डॉ.चासकर म्हणाले.

यावेळी प्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे यांनी आपल्या खास विनोदी आणि मिश्कील शैलीत विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी जीवनातील प्रत्येक क्षणाचा मनमुराद आनंद घ्यावा. आपल्या खांद्यावर संपूर्ण जगाचे ओझे आहे, अशा आविर्भावात कधीही वागू नये. या भूतलावर कोणामुळे कोणाचे काहीही अडून राहत नाही. त्यामुळे आपल्यामुळेच सर्व काही चालते किंवा आपल्याशिवाय काहीच होणार नाही, असा गैरसमज मनात बाळगू नका. आयुष्यातील प्रत्येक गोष्टीचा आनंद घ्या, मनमोकळेपणाने जगा, मजा करा आणि सदैव आनंदी राहा. युवक महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला नवी दिशा देण्याची संधी उपलब्ध होत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रध्दा साळवे आणि प्रा. बालाजी भंडारे यांनी केले, तर युवक महोत्सव ज्ञानतीर्थचे संयोजन सचिव डॉ. प्रशांत सुतकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# डोंगराळे प्रकरणातील नराधमाला फाशीची शिक्षा



नाशिक:जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे १६ नोव्हेंबर २०२५ रोजी एका चार वर्षाच्या चिमुकलीवर गावातच राहणाऱ्या २४ वर्षीय नराधमाने अत्याचार करून तिची निर्घृणपणे हत्या केली होती.या प्रकरणी आज शुक्रवार (दि.१६) रोजी न्यायालयाने आरोपी विजय खैरनारला फाशीची शिक्षा सुनावली.

नराधमाने केवळ चिमुकलीवर अत्याचारच केला नाही तर त्याने तिची निर्घृणपणे हत्या सुद्धा केली. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली. नराधमाला लवकरात लवकर फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली होती. ज्यानंतर या प्रकरणी ज्येष्ठ सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी या प्रकरणी पीडित कुटुंबीयांकडून युक्तिवाद केला. साधारणतः ११ महिने खटला चाललेल्या या प्रकरणाचा आज शुक्रवारी (१६ ऑक्टोबर) निकाल लागला असून मालेगाव अपर जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी विजय खैरनार याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. मालेगाव अपर जिल्हा व सत्र न्यायाधीश के. जी. पालदेवार यांच्या न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निकाल जाहीर केला. न्यायालयाने यापूर्वीच आरोपी खैरनार याला अपहरण, बलात्कार (पोक्सो), पुरावे नष्ट करणे आणि निर्घृण खून या सर्व कलमांखाली दोषी ठरवले होते. शिक्षेच्या मुद्द्यावर झालेल्या सखोल युक्तिवादानंतर आज अखेर दोषीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.

# आमदारांनी संवाद साधला;आता खा.आष्टीकर कधी बोलणार?

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्याचे प्रश्न व नांदेड-वर्धा रेल्वे प्रकल्पाबाबत नागरिकांच्या अपेक्षा..!

हदगांव/प्रतिनिधी-हिंगोली लोकसभाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी ठाकरे गटातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर त्यांच्या स्थानिक संवादाबाबत नागरिक आणि राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली आहे.

या वर्षीच्या पडलेल्या भीषण दुष्काळाच्या संदर्भात शेतकऱ्यांच्या समस्या आणि हदगाव विधानसभा मतदार संघातील विकासकामांबाबत खासदारांनी भूमिका स्पष्ट करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.हदगाव विधानसभा क्षेत्राचे आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनी नागरिक व पत्रकारांशी संवाद साधल्यानंतर आता खा. आष्टीकर यांनीही पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे.



विशेषतः नांदेड-यवतमाळ-वर्धा रेल्वे प्रकल्पाच्या रखडलेल्या कामांना गती देण्यासाठी आमदार-खासदारांनी संयुक्त पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा नागरिकांना आहे. या रेल्वे प्रकल्पामुळे मराठवाडा आणि विदर्भातील दळणवळण, व्यापार आणि रोजगाराला चालना मिळू शकते. त्यामुळे प्रकल्पाची सद्यस्थिती, पुढील नियोजन आणि केंद्र-राज्यसरकारच्या सहभागाबाबत विद्यमान खा.आष्टीकर यांनी माहिती द्यावी, अशी मागणी होत आहे. कारण की पूर्वीसारखा त्यांचा नागरिकांशी अले असलेला समन्वय दिसून येत नाही. राज्यातील व केंद्र शासनातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसत असताना स्थानिक विकासाचे प्रश्न दुर्लक्षित होऊ नयेत अशी जाणकारांची अपेक्षा आहे. दुष्काळच्या संदर्भात शेतमजूर शेतकऱ्यांची समस्या आणि तालुक्यातील प्रलंबित विकासकामांवर दोन्ही लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास हदगाव तालुक्याला फायदा होऊ शकतो. त्यामुळे आमदारांनी संवाद साधला; आता खासदार आष्टीकर कधी बोलणार? हा प्रश्न सध्या नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.

# ऐन दुष्काळात मायक्रो फायनान्सकडून वसुलीचा तगादा

मांडवी/प्रतिनिधी-मांडवी परिसरात सततच्या अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिक संकटात सापडले आहेत. शेतीचे अतोनात नुकसान झाल्याने आणि हाताला काम नसल्यामुळे ग्रामीण भागातील महिला कर्जदार अत्यंत अडचणीत आल्या आहेत. अशा गंभीर परिस्थितीत विविध मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून सुरू असलेल्या जाचक वसुलीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

मांडवी हा भाग तसा मागास, अविकसित असून येथील बहुतांश जनता शेती व मजुरीवर अवलंबून आहे. यंदाच्या खरिपात पावसाने पाठ दिल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून हाताला काम नाही. यामुळे मायक्रो फायनान्स कंपन्यांचे हफ्ते भरणे महिलांसाठी कठीण झाले आहे. कंपन्यांकडून अपुरे कर्ज देऊन जाचक अटी लादल्या जात असल्याचा आरोप महिला करत आहेत. तसेच वसुलीसाठी येणाऱ्यांच्या त्रासामुळे परिसरात तणावाचे वातावरण असून अप्रिय घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे. या गंभीर प्रकाराची तातडीने दखल घेऊन मांडवी परिसरातील मायक्रो फायनान्स कंपन्यांची कर्ज वसुली किमान एक वर्षासाठी स्थगित करावी, अशी जोरदार मागणी जोर धरू लागली आहे. मायक्रो फायनान्स कंपन्यांनी कर्जदार महिलांचे तारण म्हणून घेतलेले ओळखपत्र व कागदपत्रे तातडीने परत करावीत, अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत. याबाबत स्थानिक आमदार आणि जिल्हाधिकारी यांनी तातडीने लक्ष घालून मायक्रो फायनान्सच्या वसुलीवर तात्काळ प्रतिबंध घालावा आणि दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता सर्वसामान्य जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी मांडवी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.




कल्याणनगर येथे जयमातादी नवरात्र दुर्गा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोकराव चव्हाण यांनी या महोत्सवाला भेट दिली. यावेळी त्यांनी श्री दुर्गा मातेची आरती करुन नागरिकांशी संवाद साधला. याप्रसंगी आ.अमरनाथ राजूरकर, महापौर सौ.कविता मुळे, माजी महापौर जयश्री पावडे, उमेश पवळे, सतीश देशमुख, अमितसिंह तेहरा, संतोष मुळे, निलेश पावडे, सखाराम तुपेकर यांच्यासह इतर उपस्थित होते.

# घोटी येथील कु.लिशा भवरेची 'एमबीबीएस'साठी निवड

किनवट/प्रतिनिधी-ग्रामीण भागातील मुले जिद्द आणि चिकाटीच्या बळावर काय करू शकतात, याचे उत्तम उदाहरण किनवट तालुक्यातील घोटी या गावाने पुन्हा एकदा दाखवून दिले. शिक्षणात नेहमीच अग्रेसर असलेल्या घोटी गावातील कु.लिशा ज्योती शंकर भवरे हिने वैद्यकीय प्रवेशपूर्व परीक्षा (नीट) यशस्वीरीत्या उत्तीर्ण करीत यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस प्रवेश मिळवला.

तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल घोटी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच निर्मलाबाई मेश्राम यांच्या हस्ते गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला.कोणत्याही यशामागे कष्टाची आणि त्यागाची शिदोरी असते. कु.लिशाच्या या यशात तिचे आई ज्योती व वडील शंकर भवरे यांच्या मार्गदर्शनासोबतच खंबीर साथ महत्त्वाची ठरली.१६ ऑक्टोबर रोजी संपन्न झालेल्या सत्कार सोहळ्या प्रसंगी घोटी गावातील



मान्यवरांनी कु.लिशाला पुढील उज्ज्वल भविष्यासाठी भरभरून आशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या. यावेळी सरपंच निर्मलाबाई मेश्राम, आई ज्योती भवरे, वडील शंकर भवरे आणि आजी यांच्यासह माधव मेश्राम, विनायक गरड, कविराज भवरे, पत्रकार गोकुळ भवरे, युवराज पाटील, अनिल मेश्राम आदींची उपस्थिती होती.

# वन्यजीव संवर्धनासाठी प्रा.एस.पी.चव्हाण यांचा सातशे किलो मीटर सायकल प्रवास

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या जैवशास्त्र संकुलातील प्रा. एस. पी. चव्हाण यांनी वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त पर्यावरण व वन्यजीव संवर्धनाचा संदेश देण्यासाठी ६९६ किलोमीटरचा सायकल प्रवास केला.

अधिवास जोडणे व वन्यजीव जोपासणे या ब्रीदवाक्यानुसार त्यांनी नांदेड-किनवट-हिंगोली -परभणी-लातूर-नांदेड असा प्रवास करून विद्यापीठाच्या चार उपकेंद्रांना भेटी दिल्या. यावेळी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना वन्यजीव संरक्षण, जैवविविधता आणि पर्यावरण संतुलनाचे महत्त्व पटवून दिले. वयाच्या ५९ व्या वर्षी हा अभिनव उपक्रम राबविल्याबद्दल कुलगुरू प्रा. डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, जैवशास्त्र संकुलाचे संचालक प्रा. बी. एस. सुरवसे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

पान १ वरुन

## मन्याड नदीत कार...

सुरक्षा कठड्यांची दुरुस्ती वेळेत झाली असती, तर अशा दुर्घटना टाळता आल्या असत्या का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित विभागाने या पुलाची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी आणि वाहनधारकांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. या घटनेबाबत पार्वतीबाई गुट्टे यांच्या नातेवाइकांकडून हा घात आहे की अपघात, अशी शंका उपस्थित केली जात असल्याचे समजते. मात्र, या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे अपघाताची परिस्थिती आणि त्यामागील कारणांचा तपास होणे महत्त्वाचे आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मन्याड नदीवरील पुलाच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

## इतवारा पोलीसांच्या हद्दीतील...

हबीब टॉकीज जवळील मटका अड्ड्यावर स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी धाड टाकुन शेख अहमद अली शेख इब्राहिम अली रा.शोभानगर,नांदेड यास अटक केली असून त्याच्या जवळून सोळा हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.इतवारा भागात कोणाच्या आर्शिवादाने मटका सुरु होता याचा शोध पोलीस अधीक्षकांनी घेवून संबंधीत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्या विरुद्ध कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

# प्रवीण गायकवाड यांची रेल्वे सल्लागार समितीवर नियुक्ती

मुदखेड/प्रतिनिधी-भाजपाचे निष्ठावंत कार्यकर्ते प्रवीण गायकवाड यांची मध्य रेल्वेच्या नांदेड विभागीय रेल्वे उपभोक्ता सल्लागार समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. खा.डॉ. अजित गोपछडे यांच्या शिफारशीनुसार दिव्यांग प्रवर्गातून त्यांना ही संधी मिळाली आहे.

प्रवीण गायकवाड यांनी गेल्या अडीच दशकांपासून



भारतीय जनता पक्षाशी एकनिष्ठ राहून पक्षसंघटनेच्या बळकटीसाठी सातत्याने कार्य केले आहे. पक्षाच्या प्रतिकूल काळातही त्यांनी आपल्या विचारांशी आणि पक्षनिष्ठेशी कोणतीही तडजोड केली नाही. गायकवाड यांच्या नियुक्तीमुळे पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना प्रोत्साहन मिळाले असून, त्यांच्या निवडीचे भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि विविध सामाजिक स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.

# नांदेड जिल्ह्यात १८ ऑक्टोबरला येलो अलर्ट

नांदेड/प्रतिनिधी- प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १८ ऑक्टोबर रोजी एक दिवसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या दिवशी जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्यासह विजांच्या कडकडाटात आणि ढगांच्या गडगडाटात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहावे आणि सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

विजा चमकत असताना नागरिकांनी शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे आणि सुरक्षित इमारतीत आश्रय घ्यावा. जवळपास सुरक्षित निवारा उपलब्ध नसल्यास सखल जागी जाऊन गुडघ्यात डोके घालून बसावे. बाल्कनी, छत किंवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नये. विजेचे खांब, तारांचे कुंपण, लोखंडी वस्तू आणि उंच झाडांपासून दूर राहावे. पाण्यात असल्यास तातडीने बाहेर पडावे. घरातील विद्युत उपकरणे बंद ठेवावीत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४